अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई–३०
दुरध्वनी क्र.– ०२२–२४९२१२१२, २४९२२६१८
Email - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक :– ३०/०४/२०२६

## –: प्रेसनोट :–

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद कमांक | १८०/२०२६, ( बदलापूर पुर्व पोलीस ठाणे, ठाणे शहर ) |
| कलम | कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपी लोकसेवक | श्री. विकास चव्हाण, लेखाधिकारी, कुळगाव बदलापूर नगरपरिषद, ठाणे |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रू. १,३४,५००/- |
| स्विकारलेली रक्कम | नाही. |
| थोडक्यात माहिती | तक्रारदार यांचे संस्थेचा रस्ता निर्मिताचा व्यवसाय आहे. कुळगांव बदलापूर नगरपरिषद मधील विविध ७७ विकासकामाकरीता तक्रारदार यांचे संस्थेला कायदिश देण्यात आले होते. दिनांक ०८/१२/२०२५ रोजी तक्रारदार हे कुळगाव बदलापूर नगरपरिषद कार्यालयात गेले असता, लोकसेवक विकास चव्हाण यांनी तक्रारदार यांना बोलावून घेतले व सांगितले की, त्यांच्या २ कामांचे देयक रू. १७,४४,०००/- त्यांचे खात्यावर जमा केली आहे. तसेच दुसऱ्या कामाचे रू. ४,९९,०००/- असे एकूण रू. २२,४३,०००/- चे ६ टक्के प्रमाणे केलेल्या कामाचा मोबादला अद्यापपर्यंत दिला नाही. तरी सदरबाबत त्यांनी केलेल्या कामाचा मोबादला म्हणून १ टक्का व मुख्याधिकारी मारूती गायकवाड साहेब यांचे ५ टक्के असून एकूण ६ टक्के म्हणून रू. १,३४,५००/- दयावे लागतील असे सांगून लाचेची मागणी केली. तसेच लाच दिली नाहीतर यापुढील येणाऱ्या फाईल्सची देयके देणार नाहीत असे सांगितले. तक्रारदार यांना लोकसेवक यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक ०९/१२/२०२५ रोजी मा. महासंचालक, ला.प्र.वि., म.रा., मुंबई यांचेसमक्ष हजर राहून लोकसेवक यांच्याविरूध्द तक्रार केली.<br><br>प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १०/१२/२०२५ रोजी पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे कामासंदर्भात रू. १,३४,५००/- लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले. म्हणुन उपरोक्त नमूद लोकसेवक यांच्याविरूध्द कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये चौकशी अधिकारी प्रमोद सुर्वे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांचे फिर्यादीवरुन बदलापूर पुर्व पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे यांना वर्ग करण्यात आला. |

**मार्गदर्शक अधिकारी :-** **श्री. संदिप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई**
**श्री. अनिल घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई**
**श्री. राजेंद्र सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई**

**चौकशी अधिकारी/फिर्यादी :- श्री. प्रमोद सुर्वे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई**

३०/०४/२६
( अजित सुळे )
सहाय्यक पोलीस आयुक्त(प्रशासन),
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

| | | |
|---|---|---|
| संपर्क | :- | **लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.**<br>**टोलफ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८** |
| व्हॉट्सअप क्र. | :- | **8828241064** मोबाईल ॲप :- **www.acbmaharashtra.net** |
| वेबसाईट | :- | **acbmaharashtra.gov.in, acbwebmail@mahapolice.gov.in** |
| ईमेल | :- | **addlcpacbmumbai@mahapolice.gov.in** |
| फेसबुक | :- | **www.facebook.com - Maharashtra ACB** |

Scanned with OKEN Scanner